RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८८

दि.२६ जुलै २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा अखेर राजीनामा

नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून गेल्या एका महिन्यापासून दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीकडून करण्यात आली होती. याच मुद्यावरून पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक हे देखील बेमुदत उपोषणाला बसले होते. मात्र, २३ जुलै रोजी सोनम वांगचुक यांनी त्यांचं उपोषण सोडलं. सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडल्यानंतरही कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरूच राहणार असल्याची घोषणा अभिजीत दीपके यांनी केली होती.

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत होता. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टी आणि विद्यार्थी ठाम होते. कॉक्रोच जनता पार्टीच्या या आंदोलनाला विरोधकांनी देखील पाठिंबा देत केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली होती. या सर्व घडामोडीनंतर आता दिल्लीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर आज (२५ जुलै) शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश

गेल्या एका महिन्यांपासून सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला अखेर मोठं यश आलं आहे. आज (२५ जुलै) केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश आल्याचं बोललं जात आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी मोठा जल्लोष केल्याचं पाहायला मिळत आहे.

**धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर अभिजीत दीपकेंची पहिली प्रतिक्रिया**



गेल्या ३६ दिवसांपासून दिल्लीत जंतर मंतरवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या मागणीला यश आलं असून




धर्मेंद्र प्रधान शिक्षणमंत्री पदावरुन पायउतार झाले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. आपण करुन दाखवलं, असं म्हणत दीपके आणि आंदोलकांनी जंतर मंतरवर जल्लोष केला. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. हे काय म्हणत होते की, या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत, अशी प्रतिक्रिया दीपकेंनी दिली.

**तर मोदींची खुर्ची धोक्यात येईल, अभिजीत दीपकेंनी काय इशारा दिला होता?**

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत असल्याचं पाहायला मिळालं. कॉक्रोच जनता पार्टीच्या मागण्याच्या पार्श्र्वभूमीवर २४ जुलै रोजी कॉक्रोच जनता पार्टीचं शिष्टमंडळ आणि केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा आणि मंत्री जितेंद्र सिंह यांच्यात जवळपास २ तास बैठक झाली होती. या बैठकीत कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळाकडून विद्यार्थ्यांच्या मागण्या सरकारसमोर मांडण्यात आल्या होत्या. याच बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याची माहिती कॉक्रोच जनता पार्टीच्या नेत्यांनी दिली होती. या बैठकीत काय घडलं? याची माहिती सांगताना अभिजीत दीपके यांनी थेट पंतप्रधान मोदींना इशारा दिला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माझं आवाहन आहे की तुम्ही धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या, जर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा तुम्ही घेतला नाही, तर उद्या तुमची खुर्ची धोक्यात येईल, असा इशारा अभिजीत दीपके यांनी दिला होता.

## शिक्षणमंत्रिपदाची जबाबदारी मिळताच प्रल्हाद जोशी यांची पहिली प्रतिक्रिया

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर, आता भाजपचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. यानंतर, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवलेल्या विश्र्वासाबद्दल त्यांचे आभार मानत, शिक्षण मंत्रालयाची ही महत्त्वाची जबाबदारी आपण संपूर्ण क्षमतेने आणि निष्ठेने पार पाडू, असे जोशी यांनी म्हटले आहे.



**काय म्हणाले प्रल्हाद जोशी? –**

सध्या प्रल्हाद जोशी यांच्याकडे, केंद्र सरकारमध्ये, ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण तसेच ठशपशुरलश्रश एपशीसू मंत्रालयाचा कार्यभार आहे. आता त्यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचाही अतिरिक्त प्रभार देण्यात आला आहे. या निर्णयासंदर्भात बोलताना ते म्हणाले, मी अत्यंत कर्तव्यभावनेने आणि नम्रतेने ही जबाबदारी स्वीकारत आहे. यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अत्यंत आभारी आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १२ वर्षांत अनेक ऐतिहासिक यश संपादन केले गेले आहे.

**माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे कौतुक –**

दरम्यान, प्रल्हाद जोशी यांनी माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या योगदानाचेही कौतुक केले. ते म्हणाले, गेल्या चार-पाच वर्षांत धर्मेंद्र प्रधान यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण प्रभावीपणे लागू केले. याच बरोबर, अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. देशाने नव्या शिक्षण पद्धतीत मोठी आणि उल्लेखनीय प्रगती केली आहे. आता पंतप्रधानांच्या मार्गदर्शनाखाली मी माझ्या संपूर्ण क्षमतेने काम करेन आणि ही जबाबदारी निष्ठेने पार पाडेन.

**कोण आहेत प्रल्हाद जोशी? –**

प्रल्हाद जोशी हे कर्नाटकच्या धारवाड मतदारसंघातून सलग पाच वेळा खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. त्यांच्याकडे सध्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाची जबाबदारी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्र्वभूमी असलेले प्रल्हाद जोशी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रिय गृहमंत्री अमित शाह यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात. आता ते आपल्याकडी खात्यांबरोबरच, देशाच्या शिक्षण मंत्रालयाच्या महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांवरही लक्ष ठेवतील.

## ॲड.त्रिंबकदास झंवर यांनी माणसं जोडण्याचे काम केले : ॲड.व्यंकट बेद्रे

### सातव्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित अभिवादन सभेत प्रतिपादन

**लातूर/ प्रतिनिधी:** राज्यातल्या ग्रंथालय चळवळीला खऱ्या अर्थाने उभे करण्याचे काम करणारे ॲड.त्रिंबकदास झंवर काका यांनी केले.कृषी,सहकार,कायदा,राजकारण,समाजकारण,ग्रंथालय अशा विविध क्षेत्रात काम करत आपल्या पक्षापलिकडे जावून,आपल्या आदर्श वर्तनाने चांगुलपणा जोपासत माणसं जोडण्याचे काम केले,त्यांची आजही ग्रंथालय चळवळ तेवढ्याच आस्थेने आठवण करतात ही अभिमानाची बाब आहे,असे प्रतिपादन ॲड.व्यंकट बेद्रे यांनी येथे केले.

जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने आज दि.२५ जुलै २०२६ रोजी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.त्रिंबकदास झंवर यांच्या सातव्या स्मृतीदिनानिमित्त ,हुतात्मा स्मारक कार्यालयात आयोजित अभिवादन सभेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे हे होते.मंचावर जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख,ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव,एल.बी.आवाळे हे उपस्थित होते.



पुढे बोलताना ॲड.बेद्रे म्हणाले की, झंवर काका यांनी प्रत्येकांशी स्नेहभाव जोपासला. वाढवला,तो आम्ही शिकला,कुणाविषयीही आकस न ठेवता त्यांनी समाजात चांगुलपणा राहिल याची काळजी घेतली,खरे तर समाजाला जोडण्याचे काम त्यांनी केले,आज अशा व्यक्तिमत्वाची उणीव भासत आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी काकांचे विचार आत्मसात करुन त्यांच्या स्मृती जपून ठेवून ग्रंथालय चळवळीने काम करावे असे विचार व्यक्त केले. एल.बी.आवाळे यांनी काकांच्या स्मृतींना उजाळा देवून,जिल्हा ग्रंथालय संघ एकसंघ ठेवू या हीच त्यांना आदरांजली ठरेल असे मत व्यक्त केले.

तर काकांच्या विचाराने निकोप ग्रंथालय चळवळ चालवू या हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे विचार अध्यक्षीय समारोपात ग्रंथमित्र प्रभाकर कापसे यांनी व्यक्त केले.

यावेळी ग्रंथमित्र युवराज जाधव,कोषाध्यक्ष राम मोतीपवळे,प्रा.डॉ.संजय मोरे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले यांनी केले.सूत्रसंचालन पी.सी.पाटील यांनी केले. संचालक बाळकृष्ण होळीकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला सहकार्यवाह ग्रंथमित्र काशिनाथ बोडके,संचालक नंदकुमार घोगरे,सूर्यकांत शिरसे,ग्रंथमित्र धनंजय पवार,सुशील मेकले,शास्त्री चव्हाण,नामदेव कास्ते, गिरीधर जंगाले,भामरे, विलास आल्टे, नागनाथ नागरगोजे,ग्रंथमित्र सूर्यकांत जाधव,सूर्यकांत जगताप, दगडू वंगवाड, मनिषा भिसे, संजय घाडगे यांच्यासह अनेक ग्रंथपाल,कार्यकर्ते उपस्थित होते.

## लातूरमधून अल्पवयीन मुलीचे अपहरण करून चिपळूणमध्ये अत्याचार

### उदगीर पोलिसांनी २४ तासांत लावला छडा, पोक्सोअंतर्गत कठोर कारवाई

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यातील उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाचे आमिष दाखवून पळवून नेल्याची आणि रत्नागिरीतील चिपळूण तालुक्यातील एका गावात डांबून ठेवून तिच्यावर अत्याचार केल्याची अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेत उदगीर ग्रामीण पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत अवघ्या २४ तासांत या गुन्ह्याचा छडा लावला. या जलद कारवाईत पोलिसांनी पीडित मुलीची सुरक्षित सुटका केली असून, या नराधम मुख्य आरोपीसह गुन्ह्यात त्याला मदत करणाऱ्या सहआरोपीलाही बेड्या ठोकल्या आहेत.

उदगीर तालुक्यातील लोणी गावातून एक अल्पवयीन मुलगी अचानक बेपत्ता झाल्यानंतर, सर्वत्र शोध घेऊनही ती न सापडल्याने हतबल झालेल्या तिच्या नातेवाईकांनी उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेतली. घटनेचे गांभीर्य आणि मुलीचे वय लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून, या संपूर्ण संतापजनक प्रकरणातील धडक कारवाईची माहिती उदगीर ग्रामीणचे पोलिस निरीक्षक गाडे यांनी दिली.

पोलिस निरीक्षक गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने वेगाने सूत्रे हलवत संशयितांच्या मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण सुरू केले. मोबाईल लोकेशनचा अचूक माग काढताना पोलिसांना अशी धक्कादायक माहिती मिळाली की, पीडित मुलगी लातूरपासून शेकडो किलोमीटर दूर रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात आहे. मुख्य आरोपीला मदत करणारा सहआरोपी गणेश बसुराज फड याचा एक मित्र चिपळूणच्या ग्रामीण भागात राहात असून, त्याच्याच घरात या पीडित मुलीला डांबून ठेवण्यात आल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले.

**उदगीर पोलिसांनी २४ तासांत मुलीची केली सुटका**



उदगीर पोलिसांनी स्थानिक यंत्रणेच्या मदतीने तातडीने छापा टाकून अवघ्या २४ तासांत पीडित मुलीची सुटका केली आणि दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांच्या संरक्षणात आल्यानंतर मुलीने रत्नागिरीत तिच्यावर झालेल्या अत्याचाराची आपबिती कथन केल्याने, या प्रकरणात भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यांतर्गत अत्यंत कडक कलमे वाढवण्यात आली आहेत. या गुन्ह्याखाली (नोंद क्र. ४८७/२०२६) मुख्य आरोपी कृष्णा अच्युत फड (१८) आणि त्याला मदत करणारा सहआरोपी गणेश बसुराज फड (२०) यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. तसेच चिपळूणमधील त्या स्थानिक मित्राच्या भूमिकेसह पोलिस आता या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

### नागरिकांसाठी सावधगिरीचा इशारा: बनावट 'एयर सुविधा २.०' संकेतस्थळापासून सावध रहा

**मुंबई/प्रतिनिधी :** नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाच्या निदर्शनास आले आहे की काही बनावट संकेतस्थळे आणि पोर्टल्स 'एअर सुविधा २.०'ची नक्कल करून प्रवाशांची दिशाभूल करत आहेत. तसेच, त्यांना पैसे भरण्याच्या बनावट पृष्ठावर पाठवून आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न केला जात आहे.

प्रवाशांना सूचित करण्यात येते की 'एयर सुविधा २.०' च्या सेवा पूर्णपणे मोफत पुरविल्या जातात आणि स्व-घोषणापत्र सादर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. 'एयर सुविधा २.०' चे एकमेव अधिकृत पोर्टल पुढीलप्रमाणे आहे: https://airsuvidha.civilaviation.gov.in/ प्रवाशांना विनंती करण्यात येते की कोणतीही वैयक्तिक किंवा प्रवासाशी संबंधित माहिती देण्यापूर्वी संकेतस्थळाचे यूआरएल काळजीपूर्वक तपासावे आणि 'एयर सुविधा २.०' सेवा देण्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही अनाधिकृत संकेतस्थळावर पैसे भरणे टाळावे.

प्रवाशांनी केवळ अधिकृत पोर्टलचाच वापर करावा आणि अधिकृत माहितीसाठी सरकारच्या अधिकृत निवेदनांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## जीवनाचा अर्थ उलगडणारी वारी एकदातरी करावी

### ह.भ.प. भगवतीताई दांडेकर यांचे प्रतिपादन; विश्वशांती गुरुकुल, वाखरी येथे प्रवचन

**लातूर/ प्रतिनिधी:** वारीमध्ये सहभागी होणारे लहान मोठे सर्व समान असतात. इथे सर्वजण एकमेकांना माऊली म्हणून प्रेमाने संबोधतात. त्यामुळे देह, मन, वाचा, बुद्धी शुध्द होते. वारीतील सर्वसमावेशकतेत जीवनाचा खरा अर्थ उलगडून सांगितला आहे. म्हणून आयुष्यात एकदा तरी वारीला जायला हवे असे प्रतिपादन ह.भ.प. भगवतीताई दांडेकर यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने आषाढी वारीचे औचित्य साधून विश्वशांती गुरुकुल, वाखरीतळ येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रवचनात ह.भ.प. भगवतीताई दांडेकर बोलत होत्या.



विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारतचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या आशीर्वादाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ह.भ.प. चिन्मय महाराज दांडेकर, श्री. काशीराम दा. कराड, माजी मंत्री उल्हास पवार, एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. मंगेश कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, प्रा. स्वाती कराड-चाटे आणि सौ. उषा विश्वनाथ कराड आदी मान्यवर उपस्थित होते.

भगवतीताई दांडेकर म्हणाल्या, महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा आहे. हा वारकरी संप्रदाय सहिष्णु, नम्र, लीन आहे. त्याच्याकडे सर्वांना सामावून घेण्याची क्षमता आहे. तेथे जातीचा, धर्माचा किंवा स्त्री-पुरुषाचा असा कोणताही भेदभाव नाही. भगवद्गीता व ज्ञानेश्वरीत जीवनाचे उद्दिष्ट सांगितले आहे. परंतु, ज्ञानेश्वरी समजवून घ्यायची असेल, तर प्रथम माणूस कळला पाहिजे. वारकरी संप्रदाय हे चांगल्या जीवनाचे दर्शन आहे.

परमात्मा पांडुरंग, ज्ञानेश्वर ही माऊलीची रुपे आहेत. माऊली म्हणजे आई, जी सर्व सोपे करुन सांगते. सर्वांवर जीवापाड प्रेम करते. जिच्या कुशीत विसावले की आराम मिळतो. त्यामुळे अनुभवाच्या ज्ञानातूनच संत मार्गाने ईश्वराकडे जाता येते. परमात्म्याच्या स्मरणाने आपल्याला हे साध्य करता येते.

उल्हास पवार म्हणाले, बाबा महाराज सातारकर यांनी सुरू केलेली दिंडीच्या माध्यमातून मन परीवर्तनाची मोठी सेवा घडत आहे. ते ही सेवा संपूर्ण दिंडी मार्गात देतात. आज त्यांच्या कन्या ही सेवा देत आहेत.

डॉ. मंगेश कराड म्हणाले, वारीची १५० वर्षांची परंपरा असणारे सातारकर महाराज यांच्या घराण्याच्या प्रवचनाची सेवा लाभणे हा पांडुरंगाचा आशीर्वाद आहे. हीच परंपरा आमच्याही घराण्याची आहे. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या आशीर्वादाने ही परंपरा पुढची पिढी समोर घेऊन जाईल. वाखरीतळ हा पंढरपूरच्या वारीतील महत्त्वाचा आणि शेवटचा टप्पा आहे. जिथे लाखो भाविक आणि ज्ञानोबा-तुकोबा एकत्र येतात यापेक्षा भक्ताला आणखी काय हवे असते. यानंतर ह.भ.प. बापूसाहेब मोरे यांचे सूश्राव्य असे कीर्तन झाले.

## संपादकीय...

### अखेर मोदी सरकार झुकले! धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा विजय

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या गेल्या बारा वर्षांच्या सत्ताकाळात सरकार आपल्या निर्णयांवर ठाम राहिले, विरोधकांचा दबाव झुगारला आणि जनआंदोलनांकडेही कठोर भूमिकेतून पाहिले, अशी विरोधकांची टीका सातत्याने होत आली. मात्र धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने या राजकीय चित्राला नवे वळण मिळाले आहे. नीट परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हा निश्चितच राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा विषय ठरला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी विद्यार्थी आणि आंदोलनकर्त्यांकडून सातत्याने केली जात होती. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर देशभरात असंतोष निर्माण झाला. 'आमच्या भविष्याशी खेळ करू नका', 'परीक्षा व्यवस्था पारदर्शक करा' आणि 'दोषींवर कारवाई करा' या मागण्यांसाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले. अखेर या दबावानंतर शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिल्याने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळाले, अशी भावना व्यक्त होत आहे. या घटनेचा सर्वात मोठा राजकीय अर्थ असा की, सत्ता कितीही मजबूत असली तरी जनतेच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे कायम दुर्लक्ष करता येत नाही. गेल्या बारा वर्षांत केंद्र सरकारने अनेकदा कठोर भूमिका घेतली. सरकार आपल्या निर्णयावरून मागे हटत नाही, अशी प्रतिमा निर्माण झाली. मात्र आज धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने जनतेच्या दबावाची ताकद पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. राजकारणात 'सरकार झुकले' हा शब्द अनेकदा टीकेसाठी वापरला जातो. पण लोकशाहीच्या दृष्टीने पाहिले तर जनतेच्या प्रश्नांसमोर सरकारने झुकणे ही कमजोरी नसून लोकशाहीची ताकद आहे. जर विद्यार्थ्यांच्या आक्रोशामुळे सरकारला आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करावा लागला असेल, तर हा लोकशाहीतील जनमताचा विजय आहे. मात्र या देशात कोणतेही सरकार संविधानापेक्षा मोठे नाही आणि कोणतीही सत्ता लोकशाहीपेक्षा मोठी नाही. भारताचे संविधान हे सर्वोच्च मार्गदर्शक तत्त्व आहे आणि लोकशाही ही या देशाच्या शासनव्यवस्थेची आत्मा आहे. पंतप्रधान असो, मुख्यमंत्री असो किंवा कोणताही मंत्री असोप्रत्येकाला संविधानाच्या चौकटीतच काम करावे लागते. जनतेने निवडून दिलेले सरकार हे जनतेचे सेवक असते, जनतेच्या वरचे मालक नव्हे. म्हणूनच सत्तेत असलेल्या कोणत्याही सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की, सरकारे येतात आणि जातात; पण संविधान कायम राहते, लोकशाही कायम राहते आणि जनतेचा अधिकार कायम राहतो. निवडणुकीत मिळालेले बहुमत हे जनतेने दिलेले अधिकारपत्र असते; ते जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याचा परवाना नसतो. आजचा प्रश्न केवळ धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा नाही. हा देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. एक विद्यार्थी अनेक वर्षे मेहनत करतो, त्याचे आई-वडील आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी आयुष्याची पुंजी खर्च करतात. अशा परिस्थितीत परीक्षेच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले, तर त्याची जबाबदारी कोणीतरी स्वीकारलीच पाहिजे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला म्हणजे प्रश्न संपला असे समजणे चुकीचे ठरेल. आता खरी कसोटी सरकारची आहे. परीक्षा व्यवस्था अधिक पारदर्शक कशी होणार? विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा कसा निर्माण होणार? कथित गैरप्रकारांची चौकशी किती निष्पक्षपणे होणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे सरकारला द्यावी लागतील. लोकशाहीमध्ये आंदोलन करणारा नागरिक हा सरकारचा शत्रू नसतो. प्रश्न विचारणारा विद्यार्थी हा देशद्रोही नसतो. सरकारवर टीका करणारा विरोधक हा देशाचा शत्रू नसतो. उलट प्रश्न विचारणे, टीका करणे आणि सरकारला जाब विचारणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. या अधिकारांचा सन्मान करणे हीच लोकशाहीची खरी ओळख आहे. नरेंद्र मोदी सरकारवर विरोधकांनी गेल्या काही वर्षांत 'हुकूमशाही प्रवृत्तीचे सरकार' अशी टीका केली. या टीकेशी प्रत्येकजण सहमत असेलच असे नाही. मात्र सरकारने आजच्या घटनेतून एक धडा घ्यायला हवाबहुमत हे जनतेने दिलेले असते, पण जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याचा परवाना बहुमत देत नाही. सरकार मजबूत असणे आवश्यक आहे; पण त्याचबरोबर सरकार संवेदनशील असणेही तितकेच आवश्यक आहे. निर्णयक्षम सरकार हवे, पण जनतेचा आवाज ऐकणारे सरकार त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. विरोधकांवर टीका करणे सोपे आहे; मात्र विद्यार्थ्यांच्या वेदना समजून घेणे ही खरी राजकीय कसोटी आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एक नवा राजकीय संदेश गेला आहे. 'सत्ता मोठी असली तरी जनता त्याहून मोठी असते; आणि जनतेपेक्षाही या देशाचे संविधान व लोकशाही सर्वोच्च आहेत.' आंदोलन कितीही दिवस चालले तरी प्रश्न न्याय्य असेल आणि जनतेचा पाठिंबा असेल, तर सरकारला त्याची दखल घ्यावीच लागते. आजचा दिवस कोणत्याही एका पक्षाच्या विजयाचा किंवा पराभवाचा म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा विजय म्हणून पाहिला पाहिजे. शिक्षण व्यवस्था ही देशाच्या भविष्याचा पाया आहे. त्या व्यवस्थेवरचा विश्वास ढासळला तर देशाच्या तरुणाईच्या भविष्यावर परिणाम होतो. म्हणूनच धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता केंद्र सरकारने विद्यार्थ्यांशी संवाद साधला पाहिजे. त्यांच्या मागण्या ऐकल्या पाहिजेत. परीक्षांमध्ये पारदर्शकता आणली पाहिजे. दोषींवर कठोर कारवाई केली पाहिजे आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत. अखेर बारा वर्षांच्या सत्ताकाळात प्रथमच जनतेच्या दबावामुळे सरकारला आपल्या भूमिकेचा फेरविचार करावा लागला, अशी राजकीय चर्चा सुरू झाली आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा त्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. मात्र या संपूर्ण घटनाक्रमाचा सर्वात मोठा संदेश स्पष्ट आहेया देशात कोणतेही सरकार संविधानापेक्षा मोठे नाही, कोणतीही सत्ता लोकशाहीपेक्षा मोठी नाही आणि कोणताही नेता जनतेपेक्षा मोठा नाही. लोकशाहीत अंतिम सत्ता जनतेची असते आणि संविधान हेच राष्ट्राचे सर्वोच्च मार्गदर्शक आहे. सत्ता बदलते, सरकारे बदलतात, मंत्री बदलतात; पण संविधान आणि लोकशाही टिकली पाहिजे. कारण संविधान वाचले तर लोकशाही वाचेल, आणि लोकशाही वाचली तरच या देशातील सामान्य माणसाचा आवाज जिवंत राहील.

# केवळ तीन महिन्यातच मोदी सरकारला बसले ३ जिव्हारी लागणारे झटके! आता पुढे काय? वारं कुठल्या दिशेनं वाहतंय?



कॉक्रोच जनता पार्टीचं दिल्लीच्या जंतर-मंतरवर सुरु असलेलं आंदोलन यशस्वी ठरलं असून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या राजीनामा दिला आहे. भारताच्या जेनझी तरुणांनी केंद्र सरकारला NEET पेपरफुटीची जबाबदारी घ्यायला भाग पाडलं, त्यामुळं हा त्यांचा मोठा विजय झाला आहे.

मोदी सरकारसाठी मोठी नामुष्की ठरली आहे. केवळ तीन महिन्यांतच ही दुसरी नामुष्की सरकारवर ओढवली आहे. पण सीजेपीच्या आंदोलनामुळं देशात एक वेगळाच प्रवाह सुरु झाल्याचं प्रकर्षानं दिसून आलं आहे. त्यामुळं आता यापुढे सरकारपुढे आणखी काय आव्हानं असू शकतात, त्याचा काय परिणाम होईल हे सविस्तर जाणून घेऊयात.

१७ एप्रिल २०२६ हा दिवस मोदी सरकारसाठी मोठा धक्कादायक दिवस होता. कारण याच दिवशी संसदेत सरकारनं १३१वी घटना दुरुस्ती विधेयक दोन-तृतीयांश बहुमत नसल्यानं नामंजुर झालं होतं. महिला आरक्षण सुधारणा विधेयकाशी जोडून सरकारनं हे घटना दुरुस्ती विधेयक मांडलं होतं. सरकारकडं लोकसभेत दोन तृतीयांश बहुमत नसतानाही महिला आरक्षणाआडून हे विधेयक आणल्यास विरोधकांची कोंडी करुन ते मंजूर करता येईल असं मोदी सरकारला वाटतं होतं. पण सरकारचा हा हेतू विरोधक एकत्रित राहिल्यानं हाणून पाडला गेला. त्यानंतर सरकारनं या विधेयकाला जोडून आणलेल्या डिलिमिटेशन बिल २०२६ आणि युनियन टेरिटरिज लॉज अमेंडमेंट ही दोन विधेयकंही मागे घ्यावी लागली. विधेयक पडल्यानंतर भाजपनं काँग्रेससह ज्या विरोधी पक्षांनी या विधेयकाविरोधात मतदान केलं त्यांच्याविरोधात महिला आरक्षण विरोधी असल्याची जोरदार मोहीमही चालवली. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रात्री आठ वाजता लाईव्ह येत देशाला संबोधित करत विरोधकांवर टीका केली. पण सभागृहात मतदान घेतल्यानंतर सरकारचा पराभव होणं ही मोठी घटना ठरली. हे मतदान म्हणजे सरकारची बहुमताची चाचणी जरी नसली तरी सरकार इथं हारल्यानं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासाठी हा जिव्हारी लागणारा झटका होता.

त्यानंतर महिन्याभरातच ३ मे २०२६ रोजी अखिल भारतीय स्तरावर घेतली जाणारी वैद्यकीय शिक्षणासाठीची छएएढ-णत्र्‍ २०२६ या परीक्षेचा पेपर फुटला परीक्षेच्या दिवशीच राजस्थानच्या सीकर इथं 'गेस पेपर', मॉक किंवा क्वेश्चन बँक व्हॉट्सअॅप आणि टेलिग्रामवर फिरत असल्याचं समोर आलं, एकूणच फुटल्याचं समोर आलं. अनेकांकडं या प्रश्नपत्रिकेशी मिळते-जुळते ९० टक्के प्रश्न पोहोचले होते. म्हणजेच १४० पैकी १२० प्रश्न तंतोतंत जुळत होते, त्यामुळं हा पेपर फुटल्याचं स्वतः सरकारनं मान्य केलं. त्यानंतर हे प्रकरण सीबीआयकडं देण्यात आलं तसंच राजस्थानच्या डजत्र्‍ च्या तपासानंतर NTA कडून १२ मे २०२६ रोजी ही परीक्षाच रद्द केली. पण परीक्षा रद्द झाल्यानं त्याचे भयंकर परिणाम समोर आले. अत्यंत मेहनतीनं या परीक्षेची तयारी करणाऱ्या २२ लाख ७९ हजार ७४३ पैकी २२ लाख ५ हजार ०३५ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात ही परीक्षा दिली. या घटनेपूर्वी २०२४ मध्ये देखील बिहारमधून NEET-UG 2024 चा पेपर फुटला होता. त्यामुळं सलग दोन वेळा पेपर फुटल्यानं आणि परीक्षा रद्द झाल्यानं शेकडो विद्यार्थ्यांना नैराश्यात ढकललं. भविष्याची चिंता सतावू लागल्यानं एकामागून एक तब्बल २० विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांची स्वप्न धुळीला मिळाली. अनेक गरीब घरातील घराचे चिरागच कायमचे निघून गेल्यानं त्यांचं पुढील जीवनच अंधकारमय बनलं. याविरोधात देशभरात संतापाची लाटच उसळली. त्यामुळं ही परीक्षा यशस्वीरित्या राबवण्याची जबाबदारी केंद्र सरकारच्या शिक्षण खात्याची असताना त्यात सातत्यानं दुर्लक्ष झाल्यानं ही पेपर लीकची घटना मोदी सरकारसाठी नामुष्कीचच ठरली. यामुळं सरकारच्या विश्वासार्हतेला मोठा तडा गेला होता.

दरम्यान, सुप्रीम कोर्टात एका खटल्याच्या सुनावणीवेळी भारताचे सरन्यायाधिश सूर्यकांत यांनी एक संदर्भ सांगताना वारंवार कोर्टात याचिका करणारे आणि बेरोजगार तरुणांचा कॉक्रोच (झुरळ) असा उल्लेख केला. त्यांच्या या विधानामुळं देशात मोठी संतापाची लाटच पसरली. त्यानंतर सरन्यायाधीशांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरणंही दिलं. आपण सरसकट देशातील तरुणांसाठी हा शब्द प्रयोग केला नव्हता तर तो नवशिक्या वकिलांसाठी होता असं त्यांनी सांगितलं. पण हे सांगायला उशीर झाल्यानं तोपर्यंत तरुणांमध्ये आपल्याला न्यायव्यस्थेकडून आणि संसदेकडून दुय्यम वागणूक दिली जात आहे. आपल्याला किंमत दिली जात नसून गृहित धरलं जात असल्याची भावना त्यांच्यामध्ये बळावत चालली होती. त्याचीच परिणा म्हणून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा मूळचा असलेल्या अभिजीत दिपके जो अमिरेकेतील बोस्टन विद्यापीठात उच्चशिक्षण पूण झाल्यानंतर तिथेच नोकरीच्या शोधात असलेला तरुण. त्यानं तिथं बसून सरन्यायाधीश आणि भाजपनं तरुणांच्या भविष्याकडं केलेल्या दुर्लक्ष्याच्या भावनेतून भाजपशी मिळतं जुळतं नाव असलेली कॉक्रोच जनता पार्टी अशा नावाची एक ऑनलाईन चळवळ सुरु केली. विशेष म्हणजे एका विडंबनात्मक विचारातून तयार झालेल्या या चळवळीनं एकाच दिवसात भव्यदिव्य रुप धारण केलं. कारण कॉक्रोच जनता पार्टीच्या इन्स्टा अकाऊंटला तब्बल एकाच दिवसात २ कोटी तरुणांनी फॉलो केलं. म्हणजेच जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचं मिरवणाऱ्या भाजपच्या इन्स्टा अकाऊंटच्या फॉलोवर्सपेक्षा कॉक्रोच पार्टीचा एका दिवसाचा फॉलोवर्सचा आकडा हा कितीतरी मोठा होता. याचं विश्लेषण भारतातील माध्यमांनी केल्यानंतर अनेकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकलीच की ही ऑनलाईन चळवळ भाजपसारख्या इतक्या बलाढ्य पक्षाला आव्हान देऊ शकते.

पण सुरुवातीला उलट सुलट चर्चा सुरु झाल्या, जेन झींनी या पार्टीला पाठिंबा दिला त्यांना कुठल्या गोष्टींचं गांभीर्य असता का? असंही बोललं गेलं. त्यामुळं ही चळवळ केवळ ऑनलाईनच राहील आणि तिथंच संपूण जाईल, असेही तर्क दिले गेले. पण या पार्टीचा संस्थापक अभिजीत दिपके हा उच्चशिक्षित असल्यानं आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि धगधगत्या तरुणाईचं आणि क्रांतीचं प्रतिक असलेल्या भगतसिंग यांच्या विचारांचा पाईक असल्यानं त्यांचा लढाऊ बाणा जागा झाला. तसंच त्यानं पूर्वी आम आदमी पार्टीसाठी सोशल मीडिया कॅम्पेनिंगचं काम केल्यानं त्याला राजकीय प्रचाराचा अनुभव गाठीशी होताच. त्याचा फायदा हे कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन वाढवण्यात झाला. सातत्यानं या आंदोलनाची सत्ताधाऱ्यांकडून खिल्ली उडवली जात असल्यानं आणि काही उडाणटप्पू भाजप समर्थक तरुणांकडून जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या गेल्यानं अभिजीत दिपकेचा स्वाभिमान दुखावला गेला असावा. त्यातूनच मग त्यानं अमेरिकेतून भारतात परण्याचा निर्णय घेतला, तोपर्यंत आपल्या संपर्कात असलेल्या काही तरुणांची टीम तयार केली. त्यांच्यावर प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपवली आणि स्वतः आंदोलनाची धुरा खांद्यावर घेतली.

दिल्लीत दाखल झाल्यानंतर जंतर-मंतर हे आंदोलनाचं ठिकाण निश्चित केलं, इथं एक दिवसाचं आंदोलन करुन झालं. याला दिल्ली पोलिसांनीही लगेचच परवानगी दिली. माध्यमांनी या आंदोलनाला गांभीर्यानं घेतलं नाही. त्यानंतर दिपकेला पर्यावरणावादी कार्यकर्ते आणि नुकतेच लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा आणि संविधानाच्या ६व्या शेड्युल अंतर्गत दर्जा मिळावा यासाठी शून्य डिग्रीखाली तापमानात आंदोलन करणाऱ्या सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत केंद्र सरकारनं अटक केली होती. कोर्टानं मध्यस्थी केल्यानंतर ६ महिन्यानंतर त्यांची तुरुंगातून सुटका झाली. पण यामुळं आंदोलनाचा आत्मविश्र्वास वाढल्यानं त्यांनी अभिजीत दिपकेला तरुणांच्या प्रश्नासाठी पाठिंबा दिला आणि ते स्वतः दिपकेसोबत पुणे, जयपूर आणि बंगळुरु इथं एक दिवसीय आंदोलनात सहभाग नोंदवला आणि त्यानंतर पुन्हा जंतर-मंतरवर उपोषण सुरु केलं. या उपोषणाला २० दिवस सरकारनं काहीही हालचाल केली नाही, शेवटी सुप्रीम कोर्टानं सरकारला नोटीस पाठवून वांगचुक यांच्या प्रकृतीची काळजी घेण्याचे आदेश दिल्यामुळं सरकारनं हालचाली केली आणि थेट वांगचुक यांना त्यांच्या उपोषणाच्या २१ व्या दिवशी पहाटे देश झोपेत असताना उचलून नेलं आणि सरकारी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केलं. पण त्यानंतर मात्र अभिजीत दिपके यांनं आपल्या टीमच्या सहकार्यानं एकहाती किल्ला लढवला. २० मार्चला संसदेवर मोर्चा काढण्याची हाक दिली आणि त्यानंतर संपूर्ण देशानं त्यांना उत्स्फुर्त पाठिंबा दिला. भारतातल्या जेनझींनी आपली धडपड देशाला आणि सरकारला दाखवून दिली. त्यानंतरही तीन दिवस जंतर-मंतरवर ठाण मांडलं आणि अखेर शनिवारी विजय खेचून आणला. सरकारनं शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा घेतला, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची मदत देण्याचं मान्य केलं, तसंच या आंदोलनात गुन्हे दाखल झालेल्या तरुणांवरील गुन्हे मागे घेण्याचं मान्य केलं.

म्हणजेच मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात जिथे आंदोलकांच्या मागणीपोटी कधीही कोणत्याही मंत्र्याचा नैतिकतेच्या आधारावर राजीनामा घेतला गेला नव्हता, पण जेनझींच्या आंदोलनाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालल्याचं आणि त्याचा परिणाम सरकारच्या प्रतिमेवर होऊ लागल्यानं अखेर पंतप्रधानांना आपल्या एका वरिष्ठ मंत्र्यांचा राजीनामा घ्यावा लागला. हा खरोखरच मोदींसाठी देखील जिव्हारी लागणारा वार होता असं म्हणावं लागेल.

पण यामुळं एकतर मोदी-शहा यांच्या कार्यपद्धतीमुळं जी नेत्यांमध्ये, मंत्र्यांमध्ये आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीती होती ती भीती नष्ट झाली. भाजपलाही देशातून मोठा विरोध होऊ शकतो आणि तो लोकशाही मार्गानं रस्त्यावर दिसूही शकतो हे या आंदोलनामुळं स्पष्ट झालं. त्यामुळं आता यापुढे सरकारला घाबरण्याचं कारण नाही, जर एकजूट असेल तर आपण मोदी सरकारलाही झुकवू शकतो हा मोठा संदेश आता देशभरात गेला आहे. त्यामुळं यापुढचा काळ आता भाजपसाठी नैतिकदृष्ट्या कठीणच असणार आहे. कारण जर अशीच सरकारविरोधातील प्रचार भविष्यात विविध कारणांमुळं वाढत गेला आणि देशात पुन्हा सत्ताबदलाचे वारे वेगानं वाहायला लागले तर येणाऱ्या २०२९ च्या लोकसभा निवडणुकाही भाजपला कठीण जाऊ शकतात. कारण २०२४ मध्येच संविधान बदलाच्या भीतीमुळं आणि त्याच्या प्रचारामुळं भाजपला स्वबळावर सत्ता आणता आली नाही, त्यांना इतर पक्षांच्या कुबड्यांवर सरकार चालवण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. पण पुढच्या निवडणुकीत खासदारांचा आकडा जर २४० पेक्षा खाली घसरला सत्ताबदल हा निश्रि्चत होऊ शकतो.

# मृत्यू नंतर लोक म्हणतील पैशांपेक्षा जास्त माणसं कमवलीस





जीवनातील सकारात्मक बदलांसाठी सवयी बदलणे, नियमित व्यायाम करणे आणि सकारात्मक विचार ठेवणे या तीन मुख्य गोष्टी महत्त्वाच्या आहेत. यामुळे माणसाचे आयुष्य सुखी आणि यशस्वी होते.सवयी आणि जीवनशैलीतील बदल सकाळी लवकर उठा: दररोज सकाळी लवकर उठल्याने शरीराला आणि मनाला ताजी ऊर्जा मिळते.नियमित व्यायाम करा: दररोज थोडासा व्यायाम वा योगा केल्याने प्रकृती उत्तम राहते.चांगले अन्न खा: वेळेवर आणि संतुलित आहार घेतल्याने शरीराचे आरोग्य सुधारते. मानसिक बदल नकारात्मकता टाळा: वाईट विचार आणि वाईट सवयींपासून नेहमी दूर राहा.कृतज्ञता बाळगा: आपल्याकडे जे आहे त्याबद्दल नेहमी समाधानी आणि आनंदी राहा.ध्येय ठरवा: जीवनात पुढे जाण्यासाठी एक योग्य ध्येय निश्चित करा.जीवनात कोणता विशेष बदल करायला तुम्हाला आवडेल? जसे की:आरोग्य सुधारणे,वेळेचे व्यवस्थापन करणे नवीन सवय सुरू करणे.प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेत असतांना लागलेली सवय. महाविद्यालयात गेल्या नंतर लागलेली सवय. शिक्षण पूर्ण झाल्यावर लागलेली नोकरी, त्यामुळे लागलेली सवय साठ कायम राहते. साठ वर्षानंतर सेवा निवृती नंतर सर्वच बदलते. तो बदल स्वीकारण्यास सर्व समर्थ नसतात.निवृत्तीनंतरही पैसे खर्च करू न शकणाऱ्या भारतीय मध्यमवर्गीय मानसिकतेचे एक कडू सत्य.त्यासाठी हा लेख प्रपंच.

भारतात १९७० ते १९९० च्या दशकात लहानाचे मोठे झालेल्या पिढीसाठी बचत ही केवळ एक सवय नव्हती; ती एक जीवनशैली होती. ती सुरक्षा होती. भविष्यातील भीतीपोटी निर्माण झालेली ती एक संरक्षण प्रणाली होती. त्या काळातील जीवनाची एकदा आठवण करून पहा.रेशन दुकानांसमोर लागलेल्या लांबच लांब रांगा. गॅस कनेक्शन मिळवण्यासाठी ओळखी आणि शिफारसी.लँडलाईन टेलिफोन कनेक्शनसाठी वर्षानुवर्षांची प्रतीक्षा. एका बजाज स्कूटरसाठी ५ ते ७ वर्षांची वाट पाहणे. ''सरकारी नोकरी'' म्हणजे आयुष्यभराची सुरक्षितता यावर असलेला ठाम विश्वास.अशा वातावरणात वाढलेल्या लोकांनी एकच धडा शिकला. आज खर्च केला, तर उद्या हाल होतील.त्यामुळे ते आयुष्य जगण्यासाठी नाही, तर आयुष्य सुरक्षित ठेवण्यासाठी जगले.

४० वर्षांचा त्याग ते पहाटे लवकर उठले आणि गर्दीच्या बसमधून ऑफिसला गेले.पावसात भिजत त्यांनी काम केले.मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी स्वतःच्या इच्छा-आकांक्षा मारल्या. नवीन शर्ट न घेता जुनेच कपडे वापरत राहिले.कुटुंबासह फिरायला जाण्याऐवजी त्यांनी एफडी () केली.बाहेर हॉटेलमध्ये जेवण्याऐवजी त्यांनी ईएमआय () भरले. आरोग्याकडे दुर्लक्ष करून पैसे वाचवले. कारण त्यांचे ध्येय एकच होते: माझ्या मुलांना त्रास होऊ नये. स्वतःच्या सुखाचा त्याग करून त्यांनी पुढच्या पिढीसाठी सुरक्षिततेचा पाया रचला. निवृत्तीनंतरही पैसे खर्च करू न शकणाऱ्या भारतीय मध्यमवर्गीय मानसिकतेचे एक कडू सत्य. आता निवृत्तीनंतर काय होते? वयाच्या ६० व्या किंवा ७० व्या वर्षी त्यांच्याकडे कर्जमुक्त हक्काचे घर असते.बँकेत लाखो-करोडो रुपये असतात.एफडी (), पीपीएफ () आणि म्युच्युअल फंड असतात.खात्रीशीर पेन्शन असते.सगळं काही असूनही, मनात मात्र अजूनही तीच गरिबीची आणि कमतरतेची भीती कायम असते.त्यामुळेच एसी () चालू करायला होणारा संकोच.चांगल्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी जायला होणारी दिरंगाई.विमानाने प्रवास करायला असणारी भीती.स्वतःच्या तब्येतीवर आणि सुखावर खर्च करायला होणारा विरोध.हे घडते कारण त्यांच्या मेंदूमध्ये ''बचतच केली पाहिजे'' हा स्विच गेली ४० वर्षे इतका घट्ट बसवला गेला आहे की, निवृत्तीच्या पहिल्या दिवसापासून जरी त्यांना सांगितले, ''आता बिंधास्त खर्च करा,'' तरी त्यांचे मन ते स्वीकारत नाही.यालाच आपण कंजूस म्हणू शकतो. जी व्यक्ती पैसे कमावण्यात पूर्णपणे यशस्वी झाली, तीच व्यक्ती स्वतःच्या आनंदासाठी ते पैसे वापरण्यात पूर्णपणे अपयशी ठरते.त्यांचे पैशांवर प्रेम नसते.त्यांचे त्यांच्या भीतीवर प्रेम असते. ''उद्या काही झाले तर?'' पैसे संपले तर?.मुलांना कमी पडले तर?. याच भीती त्यांना आयुष्य मनसोक्त जगण्यापासून रोखतात.कोणता ही जीवन जगण्याचा आनंद घेत नाही. आणि दुसऱ्याला घेऊ देत नाही.असे सेवा निवृत काही कमी नाही.

भारतीय कुटुंबांमध्ये सर्रास दिसणारी उदाहरणे - फक्त एफडीच्या () व्याजाचा वापर करणे: बँकेत ३ ते ५ कोटी रुपये असले, तरी मूळ रकमेला ( ) हात लावायचा नाही, असा त्यांचा कडक नियम असतो.वैद्यकीय उपचार पुढे ढकलणे: गुडघे दुखापत किंवा इतर त्रास असला तरी, ''अजून थोडे दिवस बघूया'' म्हणत ते वेळ मारून नेतात.पर्यटनात रस नसणे: तारुण्यात वेळ नव्हती आणि आता निवृत्तीनंतर पैसे खर्च करण्याची मानसिक तयारी नसते. मुलांसाठी संपूर्ण आयुष्य पणाला लावणे. सर्वात मोठी भीती: ''मी जास्त काळ जगलो तर?''. या पिढीने महागाईचा फटका खूप जवळून पाहिला आहे. ₹१०० ची किंमत दशकानुदशकात कशी घसरली, हे त्यांनी पाहिले आहे. हॉस्पिटलचा खर्च कसा गगनाला भिडला, हे त्यांनी अनुभवले आहे. म्हणूनच ते नेहमी वर्स्ट केस सिनॅरियोसाठी ( - अत्यंत वाईट परिस्थिती) तयार राहतात.पण शोकांतिका अशी आहे की,त्या अत्यंत वाईट परिस्थितीची तयारी करता करता,ते त्यांच्या आयुष्यातील सर्वोत्तम वर्षे गमावून बसतात.शेवटी काय उरते?.खर्च न झालेला पैसा.रिकामी घरे.लॉकरमध्ये पडून राहिलेले सोने.कधीच न वापरलेली बँक खाती.मुलांना मोठी संपत्ती मिळते खरी. पण आई-वडिलांच्या पदरी मात्र न जगलेल्या आयुष्याचे एक सुप्त दुःख उरते.हा स्विच कसा बदलायचा?



एक ''आनंद निधी'' तयार करा: प्रवास, आरोग्य आणि स्वतःच्या सुखासाठी एक वेगळे बँक खाते ठेवा, जे फक्त याच गोष्टींसाठी खर्च होईल.आरोग्यावर खर्च करणे ही गुंतवणूक आहे: वैद्यकीय खर्च म्हणजे पैशांचा अपव्यय नाही; ती चांगल्या जीवनमानासाठी केलेली गुंतवणूक आहे.मुलांना मोठ्या संपत्तीपेक्षा आनंदी आई-वडील जास्त महत्त्वाचे असतात. तुमचा आनंद त्यांच्यावर ओझे नसून, त्यांच्यासाठी आशीर्वाद आहे.जर पैशांचा वापरच केला नाही, तर त्याला काही अर्थ नाही. पैसा हे जगण्याचे एक साधन आहे, ते स्वतः आयुष्य नाही.

तुम्ही आयुष्यभर अतोनात कष्ट केले आहेत. कुटुंबासाठी संघर्ष केला आहे. त्यांचे भविष्य घडवले आहे.आता... थोडे स्वतःसाठीही जगा.एसी () ऑन करा.त्या प्रवासाला निघून जा.चांगल्या हॉस्पिटलमध्ये तपासणी करा.ते नवीन चप्पल-बूट खरेदी करा.तुम्हाला आवडणारे जेवण मनसोक्त जेवा.कारण शेवटी, आयुष्य तुमची बँक बॅलन्स लक्षात ठेवत नाही; तुम्ही आनंदाने जगलेले क्षणच लक्षात ठेवते.सगळे सुखी राहोत,आणि त्यात आपलाही सहभाग असो.तुमच्या कडे किती संपती होती. आणि मुलांसाठी ठेवली हे कोणी विचारणार नाही. पण सदैव आठवणीत राण्यासाठी सामाजिक बांधिलकी ठेऊन सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक, काळा,क्रिडा क्षेत्रात आर्थिक योगदान देत जावे.त्यामुळेच तुम्ही लोकांच्या कायमस्वरूपी आठवणीत राहाल.तुमच्या मृत्यू नंतर लोक म्हणतील पैशांपेक्षा जास्त माणसं कमवलीस...मनी होता भोळेपणा, कधी न दाखविला मोठेपणा,चेहरा होता सदा हसतमुख,दिला सर्वांना आनंद खूप,अजून ही होतो भास,तू आहेस आमच्या आजूबाजूला सभोवताल.म्हणूनच पैशावर प्रेम करू नका.माणसावर प्रेम करा.बघा आपण बदललो तर जग बदलता येते. त्यासाठी शिक्षणा पदव्या काही कामाच्या किंवा महत्वाचे नाही तर समतावादी विचारांचे संस्कार खूप महत्वाचे ठरतात. हे माझ्या सेवानिवृत कर्मचारी अधिकारी मित्राच्या जीवनातील अनुभव सोशल ग्रुपवर येतात. त्यांचे हे संकलन आहे.मी पत्र लेखन,पत्रकारिता आणि असंघटित कष्टकरी कामगारांना संघटित करून न्याय मिळवून देण्याचे काम करत होतो. आता सेवानिवृत झाल्यावर ही त्यात खंड नाही.अनेक कर्मचारी अधिकारी त्याची दररोज नोंद घेतात.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.**

# अखेर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा : संविधान आणि लोकशाहीचा विजय!

## अभिजीत दिपके, सोनम वांगचुक आणि 'कॉक्रोच जनता पक्षा'च्या संघर्षाने सत्तेला दिलेला धडा; विद्यार्थ्यांच्या अश्रूंवर लाठीचा प्रहार करणाऱ्या व्यवस्थेला प्रत्युत्तर







लोकशाहीत सत्ता बदलते, सरकारे येतात-जातात, मंत्री बदलतात पण जनतेच्या प्रश्नांची ताकद कधीच संपत नाही.देशाच्या राजधानीतील जंतर-मंतरवर गेल्या काही आठवड्यांपासून घुमणारा विद्यार्थ्यांचा आवाज अखेर सत्तेच्या सर्वोच्च दालनापर्यंत पोहोचला आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने या संघर्षाला एक ऐतिहासिक वळण मिळाले. नीट-युजी आणि राष्ट्रीय परीक्षांमधील कथित अनियमितता, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ, उत्तरदायित्वाची मागणी आणि सरकारच्या भूमिकेविरोधातील आंदोलन यामुळे निर्माण झालेल्या दबावाच्या पार्श्वभूमीवर प्रधान यांनी २५ जुलै २०२६ रोजी राजीनामा दिला. हा राजीनामा केवळ एका मंत्र्याचा राजीनामा नाही. हा प्रश्न विचारणाऱ्या तरुणाईचा विजय आहे. हा अहिंसक संघर्षाचा विजय आहे. हा संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विजय आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सत्तेपेक्षा जनता मोठी असते, याची लोकशाहीला पुन्हा एकदा झालेली जाणीव आहे. या विजयाच्या केंद्रस्थानी आहेत अभिजीत दिपके, 'कॉक्रोच जनता पार्टी', सोनम वांगचुक आणि हजारो विद्यार्थी-युवक.

**एका प्रश्नातून सुरू झालेली ठिणगी**

परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी केवळ प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका नव्हे. परीक्षा म्हणजे त्यांच्या आयुष्याची दिशा. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका गरीब विद्यार्थ्याने वर्षानुवर्षे केलेला अभ्यास, आई-वडिलांनी केलेला त्याग, घरातील आर्थिक परिस्थितीशी लढत त्याने मिळवलेली संधी, या सगळ्याचे मोल एका परीक्षेच्या निकालात दडलेले असते. म्हणूनच परीक्षेतील कथित पेपरफुटी किंवा गैरप्रकार हा केवळ प्रशासकीय दोष नसतो. तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर झालेला प्रहार असतो. याच वेदनेतून प्रश्न उभा राहिला. ''जर व्यवस्था चुकली, तर जबाबदार कोण?'' आणि या प्रश्नाला आवाज मिळाला जंतर-मंतरवर. अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली सीजेपीने या आंदोलनाला संघटित रूप दिले. सुरुवातीला अनेकांनी या आंदोलनाची खिल्ली उडवली. 'कॉक्रोच' या नावामागे दडलेला उपरोध अनेकांना समजला नाही. पण ज्याला व्यवस्था नगण्य समजते, त्याच नगण्य समजल्या गेलेल्या आवाजाने अखेर सत्तेच्या भिंती हादरवल्या. जंतर-मंतरवरील आंदोलनात विद्यार्थ्यांसोबत युवक, पालक आणि विविध घटक सहभागी झाले. ६ जूनच्या आंदोलनापासून सीजेपीने शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी अधिक तीव्र केली आणि पुढील दिवसांत हा संघर्ष वाढत गेला.

**लाठीने प्रश्न सुटत नाहीत !**

लोकशाहीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर दडपशाही केली गेली, तर सरकारची नैतिक उंची कमी होते. जंतर-मंतर असो किंवा दिल्लीच्या रस्त्यांवरील संघर्ष विद्यार्थ्यांनी आपला आवाज बुलंद केला. काही ठिकाणी पोलिस कारवाई, आंदोलनांवर निर्बंध आणि आंदोलकांना रोखण्याचे प्रयत्न झाले. आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा निषेध करणे आवश्यक आहे. कारण लाठी विद्यार्थ्यांच्या शरीरावर बसते पण तिचा आवाज संपूर्ण देशाच्या विवेकाला ऐकू येतो. ज्यांच्या हातात कालपर्यंत पुस्तके होती, त्यांच्या हातात आज आंदोलनाचे फलक आले असतील तर त्यामागची कारणे सरकारने तातडीने शोधली पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या हातातील पुस्तक काढून घेऊन त्यांना शांत करता येत नाही. लाठीने शरीर जखमी करता येते पण प्रश्न मारता येत नाहीत. पोलिस बंदोबस्त वाढवता येतो, पण लोकशाहीची अस्वस्थता बंदिस्त करता येत नाही.





**सोनम वांगचुक यांचा उपोषणाचा नैतिक दबाव**

या संघर्षाला आणखी नैतिक बळ मिळाले ते शिक्षण सुधारणा कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणामुळे. २६ दिवसांच्या उपोषणानंतर वांगचुक यांनी उपोषण सोडले; मात्र त्यांच्या आंदोलनाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. उपोषण म्हणजे केवळ अन्नत्याग नाही. उपोषण म्हणजे, ''माझ्या शरीराची किंमत मोजावी लागली तरी मी हा प्रश्न सोडणार नाही,'' असा नैतिक निर्धार. वांगचुक यांच्या उपोषणाने सरकारला एक कठीण प्रश्न विचारला, तो म्हणजे ''विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या प्रश्नावरही सरकार इतके बहिरे होणार का?'' एका बाजूला विद्यार्थ्यांचे आंदोलन, दुसऱ्या बाजूला सीजेपीचा संघर्ष आणि तिसऱ्या बाजूला वांगचुक यांचा उपोषणाचा नैतिक दबाव. या त्रिकोणाने आंदोलनाला वेगळी धार दिली.

**अभिजीत दिपके : उपहासातून प्रतिकाराची भाषा**

अभिजीत दिपके यांचे नेतृत्व या आंदोलनातील एक वेगळे प्रकरण ठरले. 'कॉक्रोच जनता पार्टी' या नावातूनच त्यांनी सत्तेच्या अहंकाराला आव्हान दिले. ज्याला तुम्ही नगण्य समजता, तोच कधीकधी सर्वात कठीण प्रश्न विचारतो. सीजेपीच्या या आंदोलनाने तरुणाईच्या असंतोषाला व्यासपीठ दिले. आंदोलनकर्त्यांनी जंतर-मंतरवर ठिय्या दिला, रात्रीही आंदोलन सुरू ठेवले आणि मागणी मान्य होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. ''राजीनामा द्या!'' ही मागणी हळूहळू आंदोलनाची घोषणा बनली आणि आज अखेर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा आला!

**धर्मेंद्र प्रधान यांच्या पत्रात काय आहे?**

राजीनामा देताना धर्मेंद्र प्रधान यांनी युवकांना उद्देशून पत्र लिहिले. त्यांनी आपल्या चार दशकांहून अधिक काळाच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचा उल्लेख केला. विद्यार्थ्यांच्या आकांक्षा, स्वप्ने आणि भवितव्याबद्दल आदर व्यक्त केला. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन, विश्वास आणि सहकार्याबद्दल आभार मानले. नीट-युजी संदर्भातील घटनांचा उल्लेख करत त्यांनी सरकारने परीक्षा रद्द करणे, पुन्हा परीक्षा घेणे आणि पुढील काळात संगणकाधारित परीक्षेचा विचार करणे यांसारखी पावले उचलल्याचे सांगितले. पत्रातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी लिहिले की, जंतर-मंतर आणि देशातील परिस्थितीचा गैरफायदा 'राष्ट्रविरोधी शक्तींना' घेता येऊ नये, विद्यार्थ्यांचे भविष्य कायदेशीर गुंतागुंतीत अडकू नये आणि त्यांना आपल्या अभ्यास व करिअरवर लक्ष केंद्रित करता यावे, या विचाराने त्यांनी पंतप्रधानांकडे राजीनामा सादर केला. पण हे पत्र वाचताना एक प्रश्न मात्र मनात येतो, जर विद्यार्थ्यांचे भविष्य खरोखरच सर्वोच्च असेल, तर त्या भविष्याशी संबंधित प्रश्न निर्माण होईपर्यंत जबाबदारी निश्चित का झाली नाही? आणि जर अखेर राजीनामा द्यावाच लागला, तर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला इतके दिवस संघर्ष का करावा लागला? हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

**मोदी-शाह आणि सरकारला जनतेचे प्रश्न ऐकावेच लागतील!**

आजचा राजकीय प्रश्न केवळ धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापुरता मर्यादित नाही. तर या घटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या उत्तरदायित्वावरही प्रश्नचिन्ह उभे केले आहे. सत्ता कितीही प्रबळ असो, लोकशाहीत ती जनतेला उत्तरदायी असते. सरकारला प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही, राष्ट्रविरोधी किंवा अडथळा म्हणून हिणवण्याऐवजी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. प्रधान यांच्या पत्रात 'राष्ट्रविरोधी शक्तींना' परिस्थितीचा फायदा घेऊ न देण्याचा उल्लेख आहे, परंतु आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रविरोधी ठरविणे हा लोकशाहीचा मार्ग होऊ शकत नाही. विद्यार्थी प्रश्न विचारतात म्हणजे ते देशविरोधी होत नाहीत. सरकारवर टीका करतात म्हणजे ते राष्ट्रद्रोही होत नाहीत.राजीनामा मागतात म्हणजे ते संविधानविरोधी होत नाहीत. उलट संविधानानेच प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलनाचा आणि अभिव्यक्तीचा अधिकार दिला आहे. म्हणूनच मोदी सरकारने आणि शाह यांनी या आंदोलनातून धडा घेतला पाहिजे. जनतेचा आवाज ऐकण्यासाठी निवडणुकीची वाट पाहण्याची गरज नसते. लोकशाही दररोज चालते संसदेत चालते, रस्त्यावर चालते, विद्यापीठात चालते आणि कधी कधी जंतर-मंतरवरही चालते.

**संसदेत आता फक्त प्रधान नव्हे, तर इतर भ्रष्ट मंत्र्यांच्याही राजीनाम्याची मागणी झाली पाहिजे!**

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एक नवा राजकीय प्रश्न निर्माण केला आहे. जर एका प्रकरणात नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देता येतो, तर इतर गंभीर आरोप आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांतही मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारायची की नाही? हा प्रश्न आता संसदेत विरोधी पक्षांनी अधिक तीव्रतेने उपस्थित केला पाहिजे. देशातील विविध घोटाळे, भ्रष्टाचाराचे आरोप, प्रशासकीय अपयश, शेतकरी, बेरोजगारी, महागाई, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील प्रश्न या सर्व विषयांवर सरकारने संसदेत उत्तर दिले पाहिजे. राजीनामा हा शिक्षा नसतो, तर तो नैतिक जबाबदारीचा स्वीकार असतो. म्हणूनच ज्या मंत्र्यांवर गंभीर आणि सिद्ध आरोप आहेत, ज्यांच्या कार्यकाळात मोठे प्रशासकीय अपयश झाले आहे किंवा ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे ठोस आरोप आहेत, त्यांच्या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून आवश्यक असल्यास राजीनाम्याची मागणी संसदेत झाली पाहिजे. पण ही मागणी पुराव्यावर, कायद्यावर आणि संविधानिक प्रक्रियेवर आधारित असली पाहिजे, राजकीय सूडबुद्धीने नव्हे.

**विरोधकांचा सहभाग : आंदोलनाला व्यापक राजकीय दिशा**

या आंदोलनात विविध राजकीय पक्ष आणि विरोधी नेत्यांनीही सहभाग किंवा समर्थन व्यक्त केले. राष्ट्रीय परीक्षांच्या पारदर्शकतेचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा मुद्दा नसून लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. विरोधकांनी संसदेत हा प्रश्न उपस्थित करणे, सरकारला जाब विचारणे आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांना राजकीय व्यासपीठ मिळवून देणे ही लोकशाहीतील त्यांची भूमिका आहे. आंदोलनाच्या काळात विरोधकांनी संसदेतही या मुद्द्यावर सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. मात्र या आंदोलनाचे श्रेय केवळ राजकीय पक्षांना देता येणार नाही. कारण आंदोलनाचा पहिला आवाज विद्यार्थ्यांचा होता. सीजेपीने तो आवाज संघटित केला. अभिजीत दिपके यांनी त्याला नेतृत्व दिले. सोनम वांगचुक यांनी त्याला नैतिक बळ दिले आणि देशभरातील जनतेने त्याला प्रतिसाद दिला. राजकीय पक्ष आले, पण आंदोलनाची ज्योत विद्यार्थ्यांनी पेटवली होती.

धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला, पण आता पुढे काय?नीट आणि राष्ट्रीय परीक्षांची व्यवस्था पारदर्शक होणार का?पेपरफुटी करणाऱ्यांना कठोर शिक्षा होणार का? विद्यार्थ्यांना भरपाई मिळणार का? आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील सर्व अन्यायकारक कारवाई मागे घेतली जाणार का? परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचाराची मुळे उखडली जाणार का? या प्रश्नांची उत्तरे आता सरकारला द्यावी लागतील. कारण धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा या संघर्षाचा शेवट नसून, उत्तरदायित्वाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. आज जंतर-मंतरवर विजयाचा जल्लोष आहे. उद्या हेच विद्यार्थी पुन्हा आपल्या वर्गात जातील. त्यांच्या हातात पुन्हा पुस्तके असतील, डोळ्यांत स्वप्ने असतील आणि मनात डॉक्टर, अभियंता, संशोधक किंवा अधिकारी होण्याची आकांक्षा असेल. पण त्या स्वप्नांसोबत त्यांच्या मनात एक विश्वासही असला पाहिजे. आपली मेहनत सुरक्षित आहे, आपले भविष्य सुरक्षित आहे आणि परीक्षा व्यवस्था निष्पक्ष आहे.

**संविधान जिंकले, लोकशाही जिंकली!**

आजच्या दिवसाचा सर्वांत मोठा संदेश हा आहे की सत्तेची ताकद कितीही मोठी असली तरी संविधानाच्या चौकटीत प्रश्न विचारणारा नागरिक त्याहून मोठा असतो. जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांनी हे सिद्ध केले, अभिजीत दिपके यांनी हे दाखवून दिले आणि सीजेपीने हे अधोरेखित केले. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाने याला नैतिक बळ दिले आणि अखेर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने या संघर्षाला एक निर्णायक अध्याय मिळाला. पण हा विजय कोणाच्याही पराभवाचा उत्सव नसावा. हा व्यवस्थेच्या आत्मपरीक्षणाचा दिवस असला पाहिजे. मोदी सरकारने आत्मपरीक्षण करावे. अमित शाह यांनीही या लोकशाही संदेशाकडे गांभीर्याने पाहावे. संसदेने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करावी आणि देशातील प्रत्येक राजकीय पक्षाने सत्ता कोणाचीही असो, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड होणार नाही, यासाठी एकत्र उभे राहावे. कारण आज धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला आहे. उद्या दुसरा मंत्री येईल. सरकारे बदलतील. सत्ताधारी बदलतील पण विद्यार्थ्यांचे भविष्य बदलता कामा नये.

आज सीजेपीचा संघर्ष यशस्वी झाला असेल, उद्या पुन्हा एखादा विद्यार्थी अन्यायाविरुद्ध उभा राहू शकतो. आज जंतर-मंतरवर घोषणा घुमल्या, उद्या त्या घोषणांचे रूप कायदा, धोरण आणि पारदर्शक व्यवस्थेत बदलले पाहिजे. म्हणूनच आजचा दिवस केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा दिवस नाही. हा दिवस आहे विद्यार्थ्यांच्या अश्रूंना न्याय मिळवून देण्याच्या संघर्षाचा, सत्तेला प्रश्न विचारण्याच्या संविधानिक अधिकाराचा, अहिंसक आंदोलनाच्या नैतिक शक्तीचा आणि लोकशाहीच्या जिवंतपणाचा. सरकार चुकले तर प्रश्न विचारण्याचा अधिकार आपल्याला आहे, हा विश्वास जिवंत राहिला पाहिजे. कारण लोकशाहीत प्रश्न विचारणारा नागरिक हा व्यवस्थेचा शत्रू नसतो तर तो व्यवस्थेला अधिक जबाबदार बनवणारा घटक असतो. सत्तेला प्रश्न विचारण्याच्या संविधानिक अधिकाराचा, अभिजीत दिपके आणि सीजीपीच्या संघर्षाचा, सोनम वांगचुक यांच्या नैतिक लढ्याचा आणि सर्वांत महत्त्वाचे, भारताच्या संविधानाचा आणि लोकशाहीचा विजय कारण लोकशाहीत जनता हीच अंतिम सत्ता असते आणि जेव्हा जनता विशेषतः तिची तरुण पिढी.

अभिजीत दिपके आणि सीजेपीने आंदोलनाला संघटित आवाज दिला. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाने संघर्षाला नैतिक बळ दिले. विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून आपल्या भविष्याचा प्रश्न देशासमोर ठेवला. विरोधकांनी संसदेत हा मुद्दा उपस्थित केला. आणि अखेर सत्तेला जनतेच्या प्रश्नाकडे पाहावे लागले. मात्र खरी कसोटी आता सुरू झाली आहे. कारण लोकशाहीत जनता हीच अंतिम सत्ता असते आणि जेव्हा देशाची तरुणाई आपल्या भविष्याच्या हक्कासाठी उभी राहते, तेव्हा सत्तेच्या सर्वांत मजबूत भिंतीवरही एक प्रश्न कोरला जातो. आमच्या भविष्याची जबाबदारी कोण घेणार? आज त्या प्रश्नाचे पहिले उत्तर मिळाले आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा! पण आता देशाला दुसरे आणि अधिक महत्त्वाचे उत्तर हवे आहे. पुन्हा कोणत्याही विद्यार्थ्याला आपल्या हक्कासाठी जंतर-मंतरवर यावे लागू नये, पुन्हा कोणत्याही पालकाला आपल्या मुलाच्या भविष्याची चिंता घेऊन रस्त्यावर उतरावे लागू नये आणि पुन्हा कोणत्याही परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये. अशी निष्पक्ष, पारदर्शक आणि उत्तरदायी शिक्षणव्यवस्था आपण उभी करणार का? या प्रश्नाचे उत्तरच या संघर्षाचा खरा विजय ठरवेल. इतिहास आता त्या उत्तराची वाट पाहत आहे. हा प्रश्न केवळ सरकारला नाही तर तो संपूर्ण व्यवस्थेला आहे.

**संयुक्त पत्रकार परिषदेनंतर सरकारची नमती भूमिका**

संयुक्त पत्रकार परिषदेनंतर अखेर केंद्र सरकारने सीजीपीच्या आंदोलनकर्त्यांनी मांडलेल्या सर्व प्रमुख मागण्या मान्य करण्याची भूमिका घेतली आणि गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षाला निर्णायक यश मिळाले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करणे, परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण करणे, दोषींवर कठोर कारवाई करणे, प्रभावित विद्यार्थ्यांना न्याय देणे तसेच आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन सरकारकडून देण्यात आले. त्यामुळे जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांचा संघर्ष, अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखालील सीजीपीची चिकाटी आणि सोनम वांगचुक यांच्या नैतिक दबावाला अखेर यश आले. सत्तेच्या दडपशाहीसमोर न झुकता संविधानिक आणि लोकशाही मार्गाने लढा दिला, तर जनतेच्या आवाजापुढे सत्तेलाही झुकावे लागते, याचा हा जिवंत पुरावा आहे.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो. क्र. ९९२३६२०९१९**

---

## आंदोलनामुळे मोदी पॅनिक झाले, त्यांना नमते घ्यावे लागले; बिगिनिंग इज द एंड; धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर पृथ्वीराज चव्हाणांची प्रतिक्रिया

दिल्ली : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा म्हणजे खरंतर लोकशाहीचा प्रचंड मोठा विजय आहे. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तो स्वीकारला की नाही? ते अजून कळलेलं नाही. शिवाय त्या संदर्भात पर्यायी व्यवस्था आणि जबाबदारी अजून कुणाकडे दिली आहे, हे देखील कळायचं बाकी आहे. पण विद्यार्थी ताकद आणि युवाशक्तीचा आज मोठा विजय झाला आहे. विरोधी पक्षांच्या एकजुटीचा हा विजय झालेला आहे.अशी प्रतिक्रिया अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली आहे. दरम्यान, मला वाटतं की हा राजीनामा जर संसदेचं अधिवेशन सुरू होण्याआधी झाला असता तर कदाचित संसदेचे अधिवेशन सुरळीतपणे चालवलं गेलं असतं. सोबतच हा मोदी सरकारच्या कार्यकाळातील जबाबदारी स्वीकारून दिलेला पहिला राजीनामा आहे आणि मला वाटतं याच एकाच वाक्यात वर्णन करायच झालं तर 'बिगिनिंग इज द एंड' ' असे करता येईल, असेही ते म्हणाले.

तर यापुढे मोदी सरकार चालणार नाही. युवाशक्ती मोदी सरकारला उलथवून टाकल्याशिवाय राहणार नाही. असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

देशाने यापूर्वी अनेक आंदोलने बघितली आहे. मात्र अशा पद्धतीचं विद्यार्थ्यांनी उभे केलेले हे देशव्यापी आंदोलन पहिल्यांदाच अनुभवले आहे. आपण मंडलच्या वेळेच आंदोलन पाहिले, गुजरात मधले विद्यार्थ्यांच आंदोलन पाहिले आणि इतर शेतकऱ्यांची आंदोलन पाहिली. मात्र देशव्यापी युवांची ताकद यातून दिसून आली. आंदोलन कुठल्याही विभागाचे किंवा जातीचे, धर्माचे, भाषेचे हे आंदोलन नव्हते. त्यामुळे या आंदोलनापुढे मोदींना नमते घ्यावे लागले, असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

परिणामी, पंतप्रधान मोदी पॅनिकमोड मध्ये गेलेले आहेत. ते मध्यरात्री व्हिडिओ प्रसारित करून युवकांना संबोधित करतात. मात्र हीच गोष्ट तुम्ही आधी का केली नाही. मोदींच्या कार्यकाळात १४२ पेपर लीग झाले आहेत. याला राजकीय पाठबळ मिळाले होते, प्रचंड मोठा माफिया यामागे काम करत होता. त्यामुळे यामागे कुणाचे संरक्षण होते, हे शोधले पाहिजे. शिवाय फास्टट्रॅक कोर्टचा काहीही उपयोग होणार नाही. ती केवळ तात्पुरती मलम पट्टी आहे. त्यामुळे मूलभूत सुधारणा करणे सरकारला आता आवश्यक आहे. न केल्यास जनतेच्या आणि युवाशक्तीच्या प्रचंड मोठ्या असंतोष आणि रोषाला या सरकारला पुन्हा सामोरे जावे लागेल, अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली.

## राज्यसभेच्या नवनिर्वाचित नामनिर्देशित खासदारांसाठी दोन दिवसीय अभिमुखता कार्यक्रम 'प्रारंभ'चे सभापतींच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी** : २०२६ च्या द्वैवार्षिक निवडणुकीत राज्यसभेवर नव्याने निवडून आलेल्यानामनिर्देशित झालेल्या खासदारांसाठी आयोजित दोन दिवसीय अभिमुखता कार्यक्रम 'प्रारंभ'चे राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आज उद्घाटन झाले. या उद्घाटन सोहळ्याला राज्यसभेचे सन्माननीय उपसभापती हरिवंश, सन्माननीय खासदार, राज्यसभेचे सरचिटणीस पी. सी. मोदी आणि राज्यसभा सचिवालयाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.दोन दिवसीय अभिमुखता कार्यक्रमाची सुरुवात राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. नवीन खासदार 'अमृत काळात' भारताच्या संसदेत प्रवेश करत आहेत; आणि 'विकसित भारत ॅ२०४७' च्या उभारणीत ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात, यावर हरिवंश यांनी भर दिला.

सरकारला उत्तरदायी ठरवण्याचा, रचनात्मक टीका करण्याचा, सरकारला योग्य मार्ग दाखवण्याचा आणि सल्ला देण्याचा खासदारांना अधिकार आहे. नवीन खासदार सरकारकडून उत्तरे मागू शकतात, जनहिताचे मुद्दे उपस्थित करू शकतात आणि विधेयकांवर सल्ला देऊ शकतात, असे हरिवंश यांनी त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.आपल्या उद्घाटनपर भाषणात सी. पी. राधाकृष्णन यांनी नवनिर्वाचित खासदारांचे हार्दिक अभिनंदन करताना नमूद केले की ६७ खासदार प्रथमच या वरिष्ठ सभागृहात आले आहेत. आपापल्या राज्यांतील सार्वजनिक व्यग्रता असूनही आठवड्याच्या उत्तरार्धात उपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी खासदारांचे कौतुक केले. त्यांची ही उपस्थिती संसदीय जबाबदाऱ्या पार पाडण्याप्रति आणि लोकशाही संस्था मजबूत करण्याप्रति असलेली तीव्र कटिबद्धता दर्शवते, असे त्यांनी सांगितले.

सर्वसमावेशक अभ्यासक्रम तयार केल्याबद्दल सरचिटणीस आणि सचिवालयाच्या अधिकाऱ्यांचे सी. पी. राधाकृष्णन यांनी कौतुक केले. या कार्यक्रमात आयटी टूल-आधारित पहिल्या-वहिल्या कार्यशाळेसह आधुनिक डिजिटल गरजांचा समावेश करण्यात आला आहे, असे त्यांनी नमूद केले.

# केज मधील भवानी चौकाने घेतला मोकळा श्वास; मात्र शिवाजी चौकाचे काय?-नागरिकांचा सवाल

## दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर हास्य क्लबचे विनोद शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतला पुढाकार

**केज/प्रतिनिधी** :केज शहरातील भवानी चौकामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून मोठमोठ्या दुर्घटना घडून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या चौकामध्ये अपघाताचे मुख्य कारण म्हणजे चौकाचे विस्तारीकरण व आजूबाजूचे अतिक्रमणामुळे जय भवानी चौक हा मृत्यूचा सापळा बनला होता. याकडे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने दुर्लक्ष केले असल्याचा आरोप जनतेतून करण्यात येत होता. त्या अनुषंगाने वेळोवेळी वर्तमानपत्रातून देखील रोष व्यक्त करण्यात येत होता. व तशा आशयाच्या बातम्या देखील प्रकाशित करण्यात आलेल्या होत्या.

नुकतेच तांबवा येथील एका ३५ वर्षीय शेतकरी युवकाला हायवा टिप्परने पाठीमागच्या टायरने चिरडून युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली होती. त्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या घटनेवर उपाय म्हणून केज येथील हास्य क्लबचे विनोद शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन शनिवार रोजी जय भवानी चौकाची रुंदी कमी करून अतिक्रमण काढले त्यामुळे आता जय भवानी चौक परिसर मोकळा श्वास घेत आहे. मात्र शिवाजी चौकाचे काय?असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

मागील काही दिवसापूर्वी केज शहरातील मुख्य रस्त्यावरील व छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील अतिक्रमण काढले होते. परंतु छत्रपती शिवाजी महाराज चौकात परत अतिक्रमणधारकांनी आपापले व्यवसाय थाटले असुन पहिल्यासारखाच छत्रपती शिवाजी महाराज चौक हा अतिक्रमणामुळे व्यापुन गेला असुन छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये दररोज छोटे-मोठे अपघात होतच आहेत.

शिवाजी महाराज चौकात अतिक्रमणा बरोबरच अवैध प्रवासी बिनधास्त पणे सुरू आहे. याला नेमके अभय कोणाचे? अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. तर या चौकात वाढलेल्या अतिक्रमणाचे करणार काय? व छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर आणि तहसील कार्यालय परिसरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हे हास्य क्लबचे विनोद शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन काढावे अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे. जर तहसील कार्यालयाच्या दोन्ही बाजूचे व शिवाजी महाराज चौक परिसरातील अतिक्रमण काढले तर विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांना दिलासा मिळेल व दररोज या ठिकाणी होणारे अपघात टळतील यासाठी हास्य क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची गरज असून त्यांना लोकप्रतिनिधी व प्रशासनाने सहकार्य करण्याची गरज आहे. अशा चर्चा नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहेत.

आता तरी खासदार रजनीताई पाटील, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार नमिताताई मुंदडा, आंबा साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव



आडसकर, माजी आमदार संगीताताई ठोंबरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड, गटनेते हारूणभाई ईनामदार यांच्यासह सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी, विविध पक्षाचे प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन जय भवानी चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील अतिक्रमण काढून दोन्ही चौकाचे नूतनीकरण करून सुशोभीकरण करावे. तसेच उपजिल्हा रुग्णालय, बसस्थानक परिसर, जय भवानी चौक, धारूर रोड, मंगळवार पेठ कॉर्नर, संत भगवान बाबा चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, तहसील कार्यालय शासकीय विश्रामगृह, शिक्षक कॉलनी यासह मुख्य ठिकाणी गतिरोधक बसवण्यासाठी आणि एचपीएम कंपनीने शहरातील मुख्य रस्ते लगत केलेली नाली निकामी असून त्यामुळे शहरात ट्रॅफिकचे प्रमाण वाढले आहे. सदरील नाली काढून पूर्वीच्या नाली प्रमाणे नाली करण्यात यावी. शहरात वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे.

# फुले शाहू आंबेडकर राईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने १८१ व्या मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने २६ जुलै २०२६, रविवार ला दुपारी २:३० वाजता, संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर येथे "राजर्षी शाहू महाराज ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आरक्षणाच्या विचाराचा इतिहास, वर्तमान आणि भविष्य. (संदर्भ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आरक्षण धोरणाचा १२४ वा वर्धापन दिन) या ऐतिहासिक प्रासंगिक विषयावर १२४ व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक जनजागृतीच्या अनुषंगाने १८१ व्या मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेला सामाजिक कार्यकर्ते चोरटकार साहित्यिक संतोष पवार हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. तर डेमोक्रॅटिक पँथर चे अध्यक्ष डॉ. कैलास गायकवाड हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशन चे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे.

करिता ९९६०३४६०५४, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८, ९८२२७७१९१९, ८६०५४०२२१४. या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते जाणून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# विविध कारणांनी आस्थापनांना ९४ हजार रुपयांचा दंड; मनपाची कारवाई




**लातूर/ प्रतिनिधी:** सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणे,सिंगल युज कॅरीबॅगचा वापर, अनधिकृत बॅनर लावणे,अतिक्रमणे करणे यासह विविध कारणांसाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध आस्थापनांना ९४ हजार ६०० रुपयांचा दंड करण्यात आला.

लातूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी मनपा प्रयत्नशील आहे. परंतु अनेकदा व्यावसायिक व व्यापाऱ्यांकडून अस्वच्छता केली जाते. अशा व्यापारी, व्यावसायिक व आस्थापनांना सूचना देऊन त्यानंतरही फरक नं पडल्यास कारवाई करण्याचे आदेश मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी, उपायुक्त वसुधा फड,मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांनी दिलेले होते.

त्यानुसार मनपाच्या स्वच्छता विभागाने छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबाजोगाई रोड, औसा रोड, गांधी चौक, गंजगोलाई, राजीव गांधी चौक, शाहू चौक, कव्हा नाका, अहिल्यादेवी होळकर चौक, आंबा हनुमान, विवेकानंद चौक या परिसरात दंडात्मक कार्यवाही केली. एकूण ९४ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ए झोनमध्ये १३ हजार रुपये, बी झोन मध्ये २९ हजार रुपये, सी झोनमध्ये १५ हजार रुपये व डी झोन मध्ये ३७ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला. या कारवाईत मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे,शिवराज शिंदे, अक्रम शेख, धोंडीराम सोनवणे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# बचत गटातील महिलांना शासकीय योजनांचा प्राधान्याने लाभ : जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड




**लातूर/ प्रतिनिधी:** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) लातूर जिल्हा कार्यालय अंतर्गत स्थापित एकता लोकसंचालित साधन केंद्र, लातूर (पश्चिम) ची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २४ जुलै रोजी भक्ती शक्ती मंगल कार्यालय येथे पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते झाली. याप्रसंगी १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वार्षिक आढावा व नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले की, बचत गटातील महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ प्राधान्याने दिला जाईल. बँकांकडून बचत गटांना गरजेनुसार जास्तीत जास्त कर्ज पुरवठा करण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महिलांनी कर्जाचा वापर उद्योग-व्यवसायासाठी करून विहित वेळेत परतफेड करावी, असे त्यांनी सांगितले. बचत गटातील महिलांची बँक कर्जाची परतफेड ९९.९५ टक्के इतकी असल्याबद्दल त्यांनी महिलांचे कौतुक केले. तसेच लोकसंचालित साधन केंद्र (सीएमआरसी) महिला विकासासाठी चांगले काम करत असल्याचे सांगत, मशरूम व्यवसाय व रेशीम लागवड यांसारख्या शेतीपूरक व शेतीवर आधारित व्यवसायांकडे महिलांनी वळावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात संयुक्त मालकी हक्काबाबत सुमती बिडवे व त्यांच्या टीमने आणि कौटुंबिक हिंसाचाराबाबत बबन हटकर यांनी पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे यांनी केले. या सभेच्या अध्यक्षस्थानी सीएमआरसीच्या अध्यक्षा अश्विनी पडिले होत्या, तर सचिव मंगल भालेराव, जयहिंद सीएमआरसीच्या व्यवस्थापक सविता पाटील, सावित्रीबाई फुले सीएमआरसीच्या व्यवस्थापक उषा डूमने, एचडीएफसीचे भरत काळे आणि कार्यकारिणीचे सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

सभेत महिला सक्षमीकरण विशेषज्ञ सुमती सोमवंशी, पोकरा प्रकल्प विशेषज्ञ जगदीश जगधने, कायदेतज्ञ इरफान शेख आणि आरोग्य तज्ञ श्रीमती मुळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. त्यानंतर उत्कृष्ट ग्राम संघ, माविम मित्र मंडळ, उद्योजक आणि समुदाय साधन व्यक्ती यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगल वाघचौरे व विजयकुमार स्वामी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वप्नील श्रीगीरी, अनंत हेरकर, प्रवीण जगताप, सतीश गीते व एकता सीएमआरसीच्या टीमने परिश्रम घेतले. व्यवस्थापक सुजाता तोंडारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# लातूर शहरातील 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या तारखेत बदल; आता २८ जुलै रोजी होणार शिबीर

**लातूर/ प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यभरात २२ जुलै २०२६ ते ०२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी सोमवारी, २७ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या शिबिराच्या तारखेत प्रशासकीय कारणास्तव बदल करण्यात आला आहे. आता हे शिबीर मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी पार्वती मंगल कार्यालय, बसवेश्वर चौकाच्या पुढे, कातपूर रोड, लातूर येथे पार पडणार आहे.

या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवा एक खिडकी प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिल्या जाणार असून, यामध्ये सातबारा व फेरफार दुरुस्ती, डिजिटल सातबारा सेवा, विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्रे वितरण, महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, गावठाण स्वामित्व सनद, फार्मर आयडी, महिलांचे नाव अधिकार अभिलेखात समाविष्ट करणे आणि पात्र निवासी अतिक्रमाणाचे नियमितीकरण यांसारख्या कामांचा समावेश आहे. तसेच मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमकरण योजना, घरकुल योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना आणि शिधापत्रिका वितरणासह केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ व मार्गदर्शन नागरिकांना एकाच ठिकाणी मिळणार आहे.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शिबिरात मोफत सर्वसमावेशक आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले असून, यात तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत डोळ्यांची तपासणी, मधुमेह, उच्च रक्तदाब, महिलांचे आरोग्य, हाडांचे आजार, कर्करोगाबाबत प्राथमिक तपासणी, रक्त तपासणी व आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे. याशिवाय पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी हरितोत्सव आयोजित करून नागरिकांना विविध प्रकारच्या फळझाडांची व इतर उपयुक्त वृक्षांची रोपे वितरीत केली जातील आणि वृक्षलागवडीबाबत जनजागृती केली जाईल. तसेच महिला व बालविकास विभाग आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती व लाभ येथे उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जांवर तत्परतेने कारवाई करणार असल्याने, लातूर शहर मतदारसंघातील सर्व नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह मंगळवारी, २८ जुलै २०२६ रोजी पार्वती मंगल कार्यालय येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

# धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याने लढा थांबणार नाही, धर्मेंद्र प्रधानांसह रॅकेटमधील सर्वांना कठोर शिक्षा करा: हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई/प्रतिनिधी** : नीट पेपर फुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला असला तरी अद्याप हा लढा संपलेला नाही, मोदी सरकारच्या शिक्षण विभागातील भ्रष्ट कारभाराविरोधातील काँग्रेस पक्षाचा लढा सुरुच राहणार आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी धर्मेंद्र प्रधान यांना व या रॅकेट मधील सर्वांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, संसदेत यावर चर्चा झाली पाहिजे, विद्यार्थ्यांवरील सर्व गुन्हे रद्द केले पाहिजेत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची जाहीर माफी मागितल्याशिवाय काँग्रेस गप्प बसणार नाही, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, धर्मेंद्र प्रधान यांना अखेर राजीनामा द्यावाच लागला पण या राजीनाम्याने हुरळून जाण्याची गरज नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या काळात त्यांनी परिक्षा पद्धतीवर पकड निर्माण करून वन नेशन, वन एक्झामिनेशनच्या माध्यमातून १५२ वेळा पेपर लिक केला, एका वर्ग विशेषाला व भाजपाच्या लोकांना फायदा पोहचवण्यात आला व यातून भ्रष्ट मार्गाने पैसे कमवण्यात आले. नीट परिक्षेसाठी पालक जेवढा पैसा खर्च करतात तो केंद्र सरकारच्या पाच विभागातील खर्चापेक्षा जास्त आहे. या रॅकेटची पाळंमुळं खोलपर्यंत गेलेली आहेत. या सर्वांचा शोध लागल्याशिवाय शांत बसता येणार नाही.

# जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी साकारली दिंडी वारी;विठ्ठल-रखुमाई अन् संतांच्या वेशभूषा साकारून चिमुकल्याने वेधले लक्ष!

**केज/प्रतिनिधी** : केज तालुक्यातील राजेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने शिक्षकांच्या व ग्रामस्थांच्या पुढाकारातून आषाढी एकादशीच्या निमित्ताने बाल दिंडी वारीचे आयोजन करण्यात आले होते.

टाळ-मृदंगाच्या गजर आणि विठ्ठल नामाच्या जयघोषाने संपूर्ण गाव व परिसर भक्तीमय वातावरणात लीन झाला होता.या दिंडी वारीमध्ये विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विठ्ठल, रखुमाई आणि संतांच्या वेशभूषेने उपस्थित नागरिकांचे मन वेधून घेतले.संत, वारकऱ्यांच्या रुपात बाल चिमुकल्यांची भक्ती पाहून पालक व ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.

शाळेच्या प्रांगणातुन ढोल-ताशांच्या व टाळ मृदंगाच्या गजरात निघालेली ही



दिंडी वारी पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

या दिंडी वारीमध्ये विठ्ठल सोनवणे याने विठ्ठल, भक्ती मेटे हिने रखुमाई तसेच इतर बाल विद्यार्थीयांनी संत ज्ञानेश्वर माऊली,संत तुकाराम महाराज, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज यांची तर आतून विद्यार्थ्यांनी संतांच्या वेशभूषा साकारल्या होत्या. त्यांच्या उत्कृष्टवेशभूषा आणि चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील भक्ती-भाव पाहून प्रत्येकजण भक्तीमध्ये मग्न झाला होता. इतर विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या वेशभूषे मध्ये टाळ-मृदंग वाजवत ज्ञानोबा-तुकाराम,विठ्ठल-विठ्ठल जय हरी विठ्ठल असे जयघोष केले.या बाल दिंडी वारीमध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

दिंडी वारीमध्ये सहभागी झालेल्या चिमुकल्यांनी टाळ- मृदंगाच्या गजर आणि अभंग गाऊन भक्तीमय वातावरण निर्माण केले. चिमुकल्यांच्या गळ्यात तुळशीच्या माळा,हातात टाळ- मृदंग पाहून नागरिक भक्तीभावात हरवून गेले. पालकांनी ही आपल्या मुलांचे कौतुक केले आणि त्यांच्या भक्तीभावाचे कौतुक केले.जिल्हा परिषद शाळा राजेगांव अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून चिमुकल्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख करून दिली.

शाळेचे मुख्याध्यापक वरवडे सर, सह शिक्षिका लोटके मॅडम, अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी यांनीही या कार्यक्रमासाठी मोठे प्रयत्न केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.